# भारतीय महाविद्यालय, अमरावती
# राष्ट्रीय सेवा योजना
**(2015 -16)**

**प्रा. निलेश कडू**
**कार्यक्रम अधिकारी**
**डॉ. आम्रपाली वासनिक**
**महिला कार्यक्रम अधिकारी**

---

# विशेष शिबीर अहवाल

सत्र 2015-16 चे विशेष शिबीर **दत्तक ग्राम निभोरा**, ता. भातकुली येथे **08 जानेवारी 2016 ते 15 जानेवारी 2016** या कालावधीत **"स्वच्छ भारत, समृध्द भारत"** या संकल्पनेतून संपन्न झाले. शिबीरामध्ये एकूण 100 विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या पथकाव्दारे ग्रामस्थांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला. **ग्राम स्वच्छता, व्यसनमुक्ती, समाज प्रबोधन प्रवचन, अंधश्रध्दा निर्मुलन, पर्यावरण जनजागृती, स्त्रीभृण हत्या जनजागृती, शेतकरी आत्महत्या, आरोग्य तपासणी, पशु रोग निदान चिकित्सा, दिंडी, प्रभात फेरी, पथनाट्य, स्वच्छ घर सुंदर घर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, गितगायन स्पर्धा, सांस्कृतीक कार्यक्रम, बंधारा व शेततळे निर्मिती** इ. उपक्रम शिबीरादरम्यान राबविण्यात आले. या सर्व उपक्रमामध्ये गावंकरी मंडळीचा मोलाचा सहभाग लाभला व समारोपीय कार्यक्रमामध्ये स्पर्धेतील सहभागी गावातील विद्यार्थांना व महिलांना प्रोत्साहनपर बक्षिस वितरीत करण्यात आली.

**विशेष शिबीराचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.**

- **08 जानेवारी 2016 (शुक्रवार):**
  - दत्तक ग्राम निंभोरा येथे सकाळी 10.30 वा. आगमन.
  - परिसर स्वच्छता, गावात येणा-या मुख्य रस्त्याची स्वच्छता व सजावट.
  - दुपारी, अजय टेकाडे (माजी रा. से. यो. स्वयंसेवक) यांचे रा. से. यो. स्वयंसेवकांना मार्गदर्शन.
  - शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदानाचे नियोजन व पाहणी.
  - गावातील पोलीस पाटील व गावकरी मंडळीशी चर्चा.

- **09 जानेवारी 2016 (शनिवार):**
  - सकाळी प्रभात फेरी काढून शिबीराच्या उद् घाटन समारंभाची तयारी.
  - शिबीराचे उद् घाटन सकाळी 10.00 वाजता झाले.
    - उद् घाटक : मा. डॉ. गणेश मालटे (समन्वयक,रा.से.यो.,सं.गा.बा.अम.विद्यापीठ)
    - अध्यक्ष : मा. डॉ. ए. जे. गादेवार (प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, अम.)
    - प्रमुख अतिथी : मा. डॉ. संतोष ठाकरे (प्राचार्य, महात्मा फुले महाविद्यालय, अम.)

- दुपारी स्वयंसेवकांचे गृप करुन गावातील प्रत्येक घरी जाऊन 'साक्षर, निरक्षर व आरोग्य सर्वेक्षण' करुन नोंदी घेतल्या.
- संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये **'ग्राम समस्या व उपाय'** या विषयावर **प्रवचन** आयोजित केले.
    - प्रवचनकार : ॲड. प्राजक्ता मंगेश राऊत

❖ **10 जानेवारी 2016 (रविवार):**

- सकाळी प्रार्थना, योगासन व प्रभात फेरीच्या माध्यमातून घोषणा देऊन व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा, पर्यावरण, स्त्रीभृण हत्या जनजागृती केली.
- स्वयंसेवकांनी शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
- दुपारी बौध्दिक सत्र
    - विषय : **स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन**
    - वक्ते : कु. गुंजन गोळे (अध्यक्ष, वुमेन फाऊंडेशन, अमरावती)
      श्री.सुचित कुंभारकर ( ध्येय स्टडी गृप, अमरावती)

  स्पर्धा परीक्षेसाठी महत्वाची पुस्तके व महत्वाच्या टिप्स देऊन विदर्भातील युवक स्पर्धा परीक्षेमध्ये मागे का? त्याची कारणे, यावर मार्गदर्शन करुन स्पर्धा परीक्षेमध्ये यशस्वी होण्याच्या टिप्स दिल्या. आज स्पर्धा ही काळाची गरज आहे. सातत्य कसे टिकवावे आणि हेच यशाचे गमक आहे असे संबोधीत केले.
- संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात पथनाट्यातून स्त्रीभृण हत्या जनजागृती, व्यसनमुक्ती जनजागृती व स्वच्छता जनजागृती केली.

❖ **11 जानेवारी 2016 (सोमवार):**

- सकाळी प्रार्थना व योगासन.
- सकाळी 09.00 वा. **'पशु रोग निदान चिकित्सा शिबीर'** आयोजन.

  पशु वैद्यकिय दवाखाना, भातकुली येथील डॉ. इजापूरे व डॉ. सवई यांनी दत्तक गावातील पाळीव जनावरे (बैल, गाय, म्हैस, बकरी इ.) यांचे लसिकरण करुन दिले व रोग निदान करुन मोफत औषधी वाटप केली. एकूण 320 जनावरांची रोग निदान चिकित्सा या शिबीरात करण्यात आली.
- स्वयंसेवकांनी गावातील तरुणांसोबत गाळाने तुडूंब भरलेल्या सांडपाण्याच्या नाल्या स्वच्छ करुन ग्राम स्वच्छता केली. त्याचबरोबर शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
- दुपारी बौध्दिक सत्र

- विषय : **राष्ट्रीय सेवा योजना आणि जीवन शिक्षण**
- वक्ते : डॉ. अनिल खांडेकर (भारतीय महाविद्यालय, अमरावती)
  प्रा. नितिन तट्टे (भारतीय महाविद्यालय, अमरावती)

  यशस्वी जीवन जगण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजनाचा कसा फायदा होतो यावर मोलाचे मार्गदर्शन केले. व्यक्तिमत्व विकास होण्यासाठी, आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना कसे फायदेशीर ठरते हे आपल्या वकृत्व शैलीत दैनंदिन जीवनातील उदाहरणे देऊन स्पष्ट केले.

- ➢ संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- ➢ रात्री सांस्कृतिक कार्यक्रमामध्ये गावातील लहान विद्यार्थ्यांची गीतगायन, नृत्य स्पर्धाचे आयोजन केले.

❖ **12 जानेवारी 2016 (मंगळवार):**

- ➢ सकाळी प्रार्थना व योगासन.
- ➢ स्वयंसेवकांनी गावातील प्रत्येक घराबाहेरील सांडपाण्याचे सोचखड्डे साफ करुन व आजुबाजूचे गवत काढून घरासमोरील परिसर स्वच्छ केला व शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
- ➢ दुपारी बौध्दिक सत्र
  - विषय : **स्वच्छ भारत समृध्द भारत**
  - वक्ते : श्री. दिनेश गाडगे (जनसंपर्क अधिकारी जि. प. अमरावती )

  स्वच्छ भारत समृध्द भारत संकल्पना स्पष्ट करत, स्वच्छता म्हणजे काय? स्वच्छतेचे फायदे काय? विविध उदाहरणाच्या साह्याने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.
- ➢ संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- ➢ रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात पथनाट्यातून शेतकरी आत्महत्या व पर्यावरण जनजागृती केली.

❖ **13 जानेवारी 2016 (बुधवार):**

- ➢ सकाळी प्रार्थना, योगासन व गावातील महिलांसाठी रांगोळी स्पर्धेचे आयोजन.
- ➢ स्वयंसेवकांनी शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
- ➢ दुपारी बौध्दिक सत्र
  - विषय : **आजचा युवक आणि सामाजिकरण**
  - वक्ते : डॉ. दया पांडे (भारतीय महाविद्यालय, अमरावती)
  - अध्यक्ष : प्रा. बबीता येवले (क्षेत्रीय समन्वयक,रा.से.यो.,सं.गा.बा.अम.विद्यापीठ)

आजच्या तरुणांच्या समस्या व उपाय, सामाजिकरणाची संकल्पना व राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्व, इत्यादी सबंधी मार्गदर्शन केले. विद्यार्थी कसा असावा त्याची सामाजिक कर्तव्य कोणती हे ग्रामगीतेच्या माध्यमातून पटवून दिले.

- संध्याकाळी प्रार्थना, रा. से. यो. गीत व त्यानंतर गावातील लहान मुलांसाठी चित्र रंगभरण स्पर्धाचे आयोजन.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात गावातील महिला भजन मंडळीने टाळ व मृदुंगाच्या सहृयाने वेगवेगळी भजने सादर केली.

❖ **14 जानेवारी 2016 (गुरुवार):**

- सकाळी प्रार्थना व योगासन.
- स्वच्छ घर सुंदर घर स्पर्धेचे आयोजन व परिक्षण.
- स्वयंसेवकांनी शेततळे व बंधारा निर्मितीसाठी श्रमदान केले.
- दुपारी बौध्दिक सत्र
  - विषय : **हिमोग्लोबीन तपासणी शिबीर**

डॉ. दिपलक्ष्मी कुळकर्णी (भारतीय महाविद्यालय, अमरावती) व भारतीय महाविद्यालयातील सी. सी. एल. टी. कोर्सचे विद्यार्थी यांनी गावातील महीलांची हिमोग्लोबीन तपासणी करुन शरीरातील हिमोग्लोबीन कमतरतेच्या समस्या विशद करत त्यावर घरेलू उपायाबद्दल मार्गदर्शन केले. एकूण 59 महीलांनी या शिबीराचा फायदा घेतला.

- संध्याकाळी प्रार्थना व रा. से. यो. गीत.
- रात्री सांस्कृतिक कार्यक्रमात गावातील पुरुष व महिलांसाठी भक्तीगीत व भजन गायन स्पर्धाचे आयोजन केले.

❖ **15 जानेवारी 2016 (शुक्रवार):**

- सकाळी प्रार्थना, योगासन व दिंडी काढून स्वच्छता व पर्यावरण जनजागृतीच्या घोषणा दिल्या, यामध्ये स्वयंसेवकांनी विविध वेशभुषा केल्या.
- स्वयंसेवकांनी शेततळे व बंधारा निर्मितीचे काम पूर्ण करुन त्याची सजावट केली व ग्राम स्वच्छता केली.
- दुपारी शिबीर समारोप कार्यक्रम
  - अध्यक्ष : मा.डॉ.ए.जे. गादेवार (प्राचार्य, भारतीय महाविद्यालय, अम.)
  - प्रमुख अतिथी : मा.डॉ. सतिश कुळकर्णी (कोषाध्यक्ष,भारतीय विद्यामंदिर,अम.)
  - प्रमुख उपस्थिती : मा. डॉ. अशोक मंडकमारे (भारतीय महाविद्यालय, अम.)
    प्रा.रावसाहेब यादगीरे (भारतीय महाविद्यालय, अम.)

समारोपीय समारंभापुर्वी प्रमुख पाहूण्यांनी विशेष शिबीराच्या कार्यपुर्तीचा आढावा घेतला. शेततळे व बंधारा निर्मितीचे काम पूर्णत्वास पाहून समाधान व्यक्त केले. ग्रामस्थांना प्रोत्साहीत करुन उपक्रम राबविले. या सर्व उपक्रमामध्ये गावकरी मंडळीचा उस्फुर्त सहभाग लाभला. स्वच्छ घर सुंदर घर स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, गितगायन स्पर्धा, नृत्य स्पर्धाचे बक्षिस वितरीत करण्यात आले.

**प्रा. निलेश कडू**
**कार्यक्रम अधिकारी**

**डॉ. आम्रपाली वासनिक**
**महिला कार्यक्रम अधिकारी**

**प्रा. पंडीत काळे**
**सहकार्यक्रम अधिकारी**

**प्रा. गायत्री चवाळे**
**सहमहिला कार्यक्रम अधिकारी**